स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पीएच. डी.संशोधन आराखडा

शाखा :- सामाजिकशास्त्र

विषय :- राज्यशास्त्र

: संशोधनाचा विषय :

कौटिल्य आणि पंडित नेहरु यांच्या राजकीय विचारांचे तुलनात्मक अध्यायन :- विषेश संदर्भ परराष्ट्र धोरण

संशोधक

बिरादार नृसिंह पांडूरंग

राज्यशास्त्र विभाग

शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

ता. चाकूर जि. लातूर

मार्गदर्शक

डॉ. गव्हाणे अजय वसंतराव

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

यशवंत कॉलेज नांदेड

ता. जि. नांदेड

सन २०१५



चाणक्य,विष्णूगुप्त,कौटिल्य



पंडीत जवाहरलाल नेहरु

प्रस्तावना :

प्राचीन भारतीय विचारवंतामध्ये यथार्थवादी आणि लौकीक चिंतन कौटील्य यांनी प्रतिपादीत केले. धर्मशास्त्रापासून राजनितीशास्त्राचा स्वतंत्र शास्त्र म्हणून अर्थशास्त्र ग्रंथात सर्वप्रथम कौटिल्याने विचार मांडले. कौटिल्याचे मुळ नाव विष्णूगुप्त असे होते. त्यांना आर्यचाणक्य या नावाने देखील ओळखले जाते. आर्य चाणक्य हे चंद्रगुप्त मौर्याचे पंतप्रधान होते. तक्षशिला विश्वविद्यालयामध्ये ते अध्यापक होते. चंद्रगुप्त या विश्वविद्यालयामध्ये अध्ययन करत होते. कौटिल्याविषयी अनेक अख्यायीका प्रसिध्द आहेत. ते कुटिल गोत्रिय असल्यामुळे त्यांना कौटिल्या, आचार्य, चणक यांचे सुपुत्र असल्यामुळे पुढे चाणक्य या नावाने ओळखले जाऊ लागले.

कौटिल्याचा स्वभाव स्वाभिमानी आणि शिघ्रकोपी होता. नंद वंशाद्वारे अपमानीत झाल्यामुळे त्यांनी अशी प्रतीज्ञा घेतली होती की, ‘‘जो पर्यंत नंद वंशाचा नाश करणार नाही तोपर्यंत शेंडीला गाठ मारणार नाही.’’ चंद्रगुप्त मौर्याला सत्तारुढ करुन ती प्रतिज्ञा पूर्ण केली. कौटिल्याच्या कुशल अध्यापक व कुशल संघटक गुणामुळे शासनावर प्रभाव होता. त्यांनी अंतर्गत व बाह्य धोक्यापासून संरक्षीत करुन स्थायी राज्याचा पाया घातला. याच आधारावर त्यांनी अर्थशास्त्र हा ग्रंथ लिहीला. कौटिल्याच्या अगोदर राज्यनितीसंबंधीत जे ग्रंथ अस्थित्वात आले होते त्या सर्वाचे सार विचारात घेऊन त्याला आपले स्वतःचे अभिप्राय जोडले होते. कौटिल्याने अर्थशास्त्राची व्याख्या राजनितीशास्त्राला पूरक अशीच केली आहे.

कौटिल्याने आपल्या राजकीय विचारात राज्याच्या उत्पत्तीसंबंधी विचार, राजासंबंधी विचार, कायदा, न्यायव्यवस्थेसंबंधी विचार, राज्य विस्तारासंबंधी विचार, गुप्तहेर, राजदुत, षडगुण्यसिध्दांत, राजमंडळाचा सिध्दांत, राजकारण, धर्म, निती, हे सर्व विचार बलशाली राष्ट्र उभारणीच्या दृष्टीकोणातून व चिंतनातून विचार मांडले.कौटल्याचे राजकीय विचार सदय स्थितीमध्ये तेवढेच उपकारक आहेत जेवढे तत्कालीन परिस्थितीमध्ये उपकारक होते. आंतराष्ट्रीय स्थिती आणि परराष्ट्र संबंधाचा विचार केल्यास आजही कौटिल्याचे युध्द व शांतता आणि कुटनिती संबंधीचे विचार मार्गदर्शक ठरतात. गुप्तहेर, राजदुत व शक्ती याचा वापर करुन आपले प्रभावक्षेत्र वाढविण्याच्या आजची राष्ट्र करीत असलेले दिसून येतात.

ब्रिटिशपुर्व कालखंडासंबंधीत असा एक गैरसमज आहे की, भारताला परराष्ट्र धोरणाच्या परंपरा नव्हत्या किंवा आधुनिक काळात त्या उपयुक्त नाहीत पण हे चुकीचे आहे. कारण एखाद्या प्रादेशिक समाजाला त्याच्या भौगोलीक पार्श्वभुमिमुळे आणि सभोवताली अस्तीत्वात असलेल्या राजकीय सत्तेच्या स्पर्धेमुळे काही विशिष्ट अनुभवाचा वारंवार प्रत्यय येतो. आणि त्यामुळे त्यांच्या परंपरा निर्माण होतात. या परंपराचा संबंध विशिष्ट संमाजरचना किंवा राजकीय सत्ता, वैचारीक बांधीलकी किंवा सांस्कृतीक स्थळ इत्यादी परिवर्तनशील घटकाशी काही प्रमाणात निगडीत असला तरी त्यात होणाऱ्या बदलांचा परंपरावरील परिणाम मर्यादीत स्वरुपाचा असतो. भौगोलीक परिस्थितीमुळे होणाऱ्या अनुभवसिध्द परिणामाचा प्रभाव जास्त स्थिर व मुलगामी स्वरुपाचा असतो. त्यामुळे जोपर्यंत परराष्ट्र धोरण निर्माण करणाऱ्या विविध घटकावर भौगोलीक प्रभाव कायम आहे. आणि संरक्षण विषयक तंत्रविज्ञानात क्रांतिकारक स्वरुपाचे बदल होत नाहीत तोपर्यंत राजकीय सत्ता कोणाचीही असली तरी त्यांना कालांतराने परराष्ट्र धोरणाचा अनुभवसिध्द परंपराचा स्वीकार करावा लागतो.

परराष्ट्र धोरणाच्या परंपरांच्या संदर्भात वर सुचवलेले मुलभुत आधार लक्षात घेतले तर प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरण परंपरापैकी काही भाग कालबाह्य व काही भाग कालसुसंगत राहू शकतो हे स्पष्ट होईल म्हणून भारताच्या विदेश

नितीच्या परंपरेचे अध्ययन करताना ब्रिटीशपूर्व कालखंडाचा आढावा घेणे उचीत ठरते. अशा प्रकारे इतिहासाच्या दिर्घ कालखंडाचे समग्रवादी दृष्टिकोनातुन अध्ययन केल्यानंतर भारताचा पराराष्ट्र धोरणाला आधारभुत ठरणारे स्थायी घटक कोणते आहेत हे निश्चित करणे शक्य होईल. म्हणून या पुढील विवेचनात भारतीय इतिहासाचे भु-राजकीय विश्लेषण केले आहे. विवेचनाच्या सुलभतेसाठी भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या परंपराची चर्चा चार क्षेत्रात विभागण्यात आली आहे.

१) भारतीय उपखंडावरील भुराजकीय प्रभाव आणि भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या प्राचीन परंपरा :-

भारतीय उपखंडाच्या भु-राजकीय रचनेचा त्याची विदेश निती व आंतरराष्ट्रीय राजकारणातील व सहभाग व भुमिकेशी अत्यंत निकटचा संबंध आहे. पुर्वीकडील आसाम व ब्रम्हदेशाची घनदाट आरण्य, उत्तरेकडील हिमालयाच्या हिमच्छादित उत्तुंग रांगा आणि पश्चिमेकडील डोंगराळ अनुउत्पादक प्रदेश व बंडखोर प्रवर्तीचे लोक इत्यादी कारणामुळे भारतीय उपखंडातील सत्ता केंद्राना भारताबाहेर सुरू असलेल्या सत्ता स्पर्धेत फारसे स्वारस्य व भाग घेण्याचे प्रयोजन नव्हते या उलट भारताच्या नैसर्गिक सिमांचे अंतर्गत विस्तारवादाला पुरेसा ठरेल एवढा विस्तीर्ण व संपन्न प्रदेश असल्यामुळे त्यांने बलिष्ट सत्ता केंद्रे निर्माण करुन एकछत्री सत्ता प्रस्थपित करण्यावर सदैव लक्ष केंद्रीत केले त्याचा परिणाम म्हणून भारतातील सर्व विजिगिषु सत्ताकेंद्राने भारता अंतर्गत एकछत्री सत्ता व भारतावर बाहेरून होणाऱ्या आक्रमणाचा प्रतिकार या धोरणाचा सातत्याने पुरस्कार केला आहे. असे इतिहासाच्या भु-राजकीय विश्लेषनावून स्पष्ट जाणवते.

भारतीय इतिहासाचे आशियाखंडाच्या इतिहासाशी तौलनिक अध्ययन केले तर असे आढळून येते की, जेंव्हा इराण व मध्य आशियातील राजकीय सत्ता आक्रमणाच्या लाटामुळे नष्ट झाल्या तेव्हा भारतावर सुध्दा आक्रमण झाले आहे. त्यामुळे या दोन्ही क्षेत्रातील सत्तासंतुलनाचा भारतातील शांतता, व्यवस्था, स्थैर्य याच्याशी प्राचीन काळापासून संबंध राहीला आहे. या घटकाचे महत्व आज सुध्दा कायम आहे. भारतातील प्राचीन वाङःमयात राजकीय संस्कृतीच्या एकात्मतेची तत्वे पुरस्कृत केली आहे. भारतातील विविध धर्म, भाषा, प्रादेशीक भिन्नत्व इत्यादीचा विचार केला तर सध्याच्या काळात सुध्दा राजकीय संस्कृतीच्या एकात्मतेचे तत्व राजकीय राष्ट्रवादाला सहायक ठरु शकते. त्यामुळे समान राजकीय संस्कृतीच्या परंपरेचा ऐतिहासिक वारसा संपुर्ण भारतीय उपखंडातील विविध स्वतंत्र राजकीय समाजांना एकत्र आणून त्यांच्यातील अविश्वासाची व भयगंडाची भावना दुर करण्यास उपयुक्त ठरु शकते त्यासाठी राजकीय संस्कृतीच्या परंपरेचा व्यापक व उदारवादी समन्वयात्मक दृष्टीकोण स्विकारण्याची आवश्यकता आहे.

राजकीय संस्कृतीच्या एकात्मतेवर भर देण्याचे एक वास्तववादी कारण होते. भारतातील भू-राजकीय मंडळाची विभागणी लक्षात घेतली आणि त्या नुसार विविध सत्ता केंद्राचे भौगोलीक स्थान व प्रवृर्ती याचे विश्लेषण केले तर असे आढळून येते की प्राचीन काळापासून दोन परस्पर विरोधी राजकीय प्रवृर्ती अस्तित्वात होत्या त्या पैकी एक प्रवृर्ती संपुर्ण भारतात एकात्म किंवा सर्वोच्च सत्ता प्रस्थापणेवर भर देणारी होती ही प्रवृत्ती निरंकुश एकछत्री सत्ता प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न करताना आढळून येते. दुसरी प्रवृत्ती प्रादेशीक मंडळाच्या व उपमंडळाच्या स्वायततेचा पुरस्कार करणारी असून एकछत्री वर्चस्व वादाला तिचा विरोध आहे. संपूर्ण ऐतिहासिक कालखंड समग्रवादी पध्दतीने विचारात घेतला तर भारतात या दोन राजकीय प्रवृत्ती मध्ये सतत सत्ता संघर्ष सुरू राहिला असून वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळी प्रवृत्ती प्रभावशाली राहीली असे आढळून येते.

भारतातील परराष्ट्रधोरण परंपरेचा तिसरा पैलू हिंदी महासागर क्षेत्राशी संबंधीत आहे. सरदार के एम पन्नीकर यांनी इंडीया ॲन्ड द इंडीयन ओशन या ग्रंथात त्याचे अतिशय मार्मीक विश्लेषन केले आहे. या पुस्तकातील प्रकरणाच्या सुरवातीला प्रादेशिक क्षेत्राला कावेरी मंडल असे संबोधले आहे. तेथे अनेक शतके पांड्य व चोल या व्यापारी व नावीक सत्ता आस्तित्वात होत्या. विशेषतः चोल सत्ता नाविक सामर्थ्यासाठी प्रसिध्द होती. या शिवाय आग्नेय आशियातील श्रीविजय व शैलेंद्र या दोन प्रमुख व आतिशय बलिष्ठ नाविक सत्ता होत्या पॅसिफिक व हिंद महासागर क्षेत्रात सुमारे १००० वर्षे त्यांचे अधिराज्य होते. चोक व शैलेन्द्र यांचा एक एक शतक पर्यत नाविक श्रेष्ठत्वासाठी संघर्ष झाला आणि त्याचा परिणाम दोघांच्याही सत्तेचा ऱ्हास होऊन अरब व्यापाऱ्यांचे समुद्रावरील वर्चस्व वाढले. या संदर्भात पणिकर यांनी असे विश्लेषण केले आहे की, हिंदू नाविक सत्ता व्यापारी स्वरुपाची नसून संघटीत राजकीय सत्ता होती. आणि त्यामुळे तिच्या पाठीशी सैन्यशक्ती, धनशक्ती, घटनात्मक एकात्मता व निश्चित धोरणाला सातत्यपुर्ण पाठिंबा देण्याची भुमिका राहत असे. त्यामुळे त्यांचे सागरी वर्चस्व निर्विवाद स्वरुपाचे व एकमुखी राहत असे. या उलट अरबाचे वर्चस्व वाढले तरी ते व्यक्तीगत वर्चस्व व्यापारी वर्ग होते त्यांना राजकीय सत्तेचे संपुर्ण समर्थन किंवा धोरणात्मक एकात्मता सातत्य व संघटीत प्रतिकार शक्ती याचा आधार नव्हता त्यामुळे पोर्तुगीज आक्रमणासमोर अरब व्यापाराचे सामर्थ्य फार कमी होते. अरबी सत्ताधिशांना त्यांच्या परिणामाची जाणीव झाली तेव्हा सागरी वर्चस्व पोर्तुगीजाकडे गेले. ,

या नंतरच्या कालखंडात पोर्तुगीज डज, इंग्रज यांच्या स्पर्धेला, सुरवात झाली आणि त्यात इंग्रज यशस्वी झाले. पणिक्कर यांच्या मते इंग्रज सत्तेने हिंदू महासागर व त्यांच्या सभोवतालच्या संपूर्ण प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित करून स्वतःचे साम्राज्य निर्माण केले बाह्य जगताशी भारताचा संबंध तुटल्यामुळे त्यांची संपुर्ण कोडी झाली आणि इंग्रजानी भारताची आर्थिक शोषण केले म्हणून हिंद महासागर क्षेत्राचे स्वातंत्रे हा भारताच्या स्वतंत्र्याचा व आर्थिक जीवनाचा समर्थ आधार आहे. व त्याचे रक्षण करणे भारताचे अध्य कर्तव्य आहे. असे पणिक्कर म्हणतात. हिंद महासागर क्षेत्रातील महाशक्तीच्या आस्तित्वावर व सत्तास्पर्धेवर भारत सतत आक्षेप घेतो. व ते शांततेचे क्षेत्र म्हणुन घोषीत व्हावे असा प्रयत्न करतो. त्याचे मुळ या ऐतिहासिक परंपरेत आहे. विसाव्या शतकात जर्मनी रशिया व जपान यांनी या क्षेत्रात नवे आव्हान उभे केले तेंव्हा इंग्रजांनी त्याला प्रखर प्रतिकार केला हे सुध्दा लक्षात ठेवले पहिजे. भविष्य काळात नवे आव्हान निर्माण झाले तर त्याचा यशस्वी प्रतिकार करण्यावर भारताची सुबत्ता, स्थैर्य, आणि स्वतंत्र अवलंबून राहिल हाच भु-राजकरण व इतिहास याचा वारसा आहे.

२) मध्ययुगीन भारतातील परराष्ट्र धोरण परंपरा :

दिल्ली येथे प्रस्थापित झालेल्या मुस्लीम सुलतानशाहीचा मुळ स्त्रोत परकीय असला तरी सत्तास्पर्धेत टिकून राहण्यासाठी त्यांना भु-राजकीय प्रभावाची दखल घेणे भाग पडले. या कालखंडात अल्तमश या दुसऱ्या सुलतानाच्या काळात जगज्येता चंगेजखानचे लक्ष प्रामुख्याने भारताबाहेरील मध्य व पश्चिम आशिया आणि युरोपकडे असल्यामुळे अल्तमशचा त्याच्याशी प्रत्यक्ष संघर्ष झाला नाही. पण तेंव्हा पासून मोगल स्वाऱ्या वारंवार होऊ लागल्यामुळे दिल्लीच्या सुलतानांना पश्चिम सिमेच्या रक्षणाकडे लक्ष केंद्रीत करावे लागले. इ.स. १२२१ ते १५२६ या काळात मंगोलाची दहा तैमुरलंगाचे एक वा बाबराची पाच अशी एकूण सोळा आक्रमने पश्चिम सिमेवर झाली. त्यांच्या प्रतिकारासाठी पंजाबमध्ये कडेकोट लष्करी मोर्चेबंदी हे सुलतानशाही कालखंडाचे वैशिष्टये होती

उपरोक्त विवेचनाच्या संदर्भात ब्रिटीश राजवटीतील भारताच्या परराष्ट्र नितिचा वारसा तपासल्यानंतरच पुर्वकालीन व ब्रिटिश कालखंडातील विदेश नितीची व साम्य व भेद स्थळे स्पष्ट होतील आणि त्यामुळे स्थायी वारसा

स्पष्ट होईल. भारताच्या विदेश नितिचे अध्ययन करताना त्यात दिर्घकालीन स्थायी परंपरेचा वारसा किती आहे किंवा भविष्य काळात त्याला कोणत्या उद्दिष्टाचा पुरस्कार करणे हे आवश्यक राहील. ही जाणीव स्पष्ट होण्यासाठी वरील समग्रव्यापी विश्लेषण केले आहे. विशेषतः भारताच्या राष्ट्रहीताची संकल्पना व दिर्घकालीन उद्दीष्टये याच्या विश्लेषण व परिक्षणासाठी इतिहासाचे समग्रव्यापी भु-राजकीय विश्लेषण अत्यावश्यक ठरते.

३) ब्रिटिश कालखंडातील परराष्ट्र धोरणाची परंपरा :

ब्रिटिश कालखंडातील भारताच्या विदेशनीतीच्या परंपराचे अध्ययन केले असता काही आपणास वैशिष्ट्ये सारांश रुपाने सांगता येतील १) ब्रिटिशांना भारताच्या भु-राजकीय हितसंबंधाची जाणीव होती व त्यांचा पुरस्कार सातत्याने करण्यात आला. २)भारताचे संरक्षण इजिप्तपासून इंडोचायनापर्यंत पसरलेल्या प्रदेशाशी व सागराशी निगडित आहे व त्या प्रदेशात ब्रिटिश सत्ता सर्वश्रेष्ठ राहणे आवश्यक आहे ही त्यांची स्पष्ट भुमिका होती. ३) भारता भोवती आक्रमणरोधक राष्ट्राचे कडे निर्माण करुन त्यांच्या विदेशनितीचे नियंत्रण त्यांच्या अंतर्गत स्थैर्य व संरक्षणासाठी आर्थिक व लष्करी मदत व आवश्यक वाटल्यास त्यांच्या रक्षणाची संपूर्ण जबाबदारी हा भारताच्या संरक्षणाचा आधार आहे असे मान्य करण्यात आले. ४) युरोपी स्पर्धकांना या क्षेत्राबाहेर ठेवण्यावर भर व परिस्थितीनुसार संघर्ष अथवा तडजोड करण्याचे धोरण स्विकारण्यात आले.

थोडक्यात भारताचे काही हितसंबंध स्थायी व काही बदलत्या स्वरुपाचे आहेत हे लक्षात ठेवून ब्रिटीशांने वास्तववादी गतिमान परराष्ट्रधोरण नितीचा पुरस्कार केला असे दिसून येते.

४) स्वतंत्र चळवळ आणि परराष्ट्रीय धोरण दृष्टीकोन :

१८८५ ते १९४७ या कालखंडात भारत सरकारची अधिकृत परराष्ट्र निती आणि राष्ट्रीय काँग्रेसची विभीन्न भुमिका असे दोन दृष्टीकोन भारतात अस्तित्वात होते परराष्ट्रीयनितीविषयी निर्माण झालेल्या दंद्ववादाचा स्वतंत्र भारताच्या विदेश नितीवर कोणता प्रभाव झाला याचे परिक्षण करणे उधबोधक ठरेल. भारत परतंत्र असताना ब्रिटीश सत्ताधीशांची परराष्ट्रनिती विषयक भुमिका भारताच्या संरक्षाणासाठी उपयुक्त असली तरी तिचे प्रधान उद्दीष्ट ब्रिटिश साम्राजशाहीच्या हितसंबंधाना पुरक होते त्यामुळे भारत सरकारच्या धोरणेला विरोध करणे हे साम्राज्यशाहीला विरोध करण्याच्या धोरनाचा एक आवश्यक पैलू होता. १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली तेंव्हा पहिल्याच आधिवेशनात या भुमिकेचा प्रत्यय आला.

५) भारताचे विभाजन व पाकिस्तानची निर्मीती :

भारतावरील अधिसत्तेचा त्याग करुन आणि भारत व पाकिस्तान या दोन स्वतंत्र राष्ट्रांना सत्ता प्रदान करुन भारतीय उपखंडातील ब्रिटिश साम्राजाचा लोप होणार असला तरी भारतातील नैसर्गिक सिमा सुरक्षीत राहण्याबद्दल ब्रिटिश राज्यकर्ते उदासीन व निष्क्रीय झाले नाहीत. विभाजनाच्या धोरनानुसार सैन्याचे सुध्दा विभाजन होणार होते आणि भारत व पाकिस्तान यात निवड करण्याचा पर्याय बटालीयन स्थरावर देण्यात आला. ही सैन्याच्या अदलाबदल करण्याची प्रक्रिया सुरु असताना ज्या सैनिकी तुकडयांनी भारताची निवड केली त्या पैकी बराच मोठा भाग वायव्य सरहदीवर तैनात होता. त्या तुकड्या तत्काळ परत फिरल्या असत्या तर ती सिमा असुरक्षीत राहिल ही खात्री असल्यामुळे पाकिस्तानी सैन्यदलाने त्या सुरक्षा जबाबदारी स्विकारल्यानंतर भारतीय सैन्याने भारताकडे प्रयाण करावे अशी तरतुद करण्यात

आली. थोडक्यात वायव्य सीमेचे रक्षण संपुर्ण उपखंडाच्या दिर्घकालीन सुरक्षा व्यवस्थेशी निगडीत आहे याची वास्तववादी जाणीव ठेवून व तशी व्यवस्था करुन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सत्तात्याग केला हे उल्लेखणीय आहे. म्हणूनच यातून असे स्पष्ट होते की भारताच्या भु-राजकीय हितसंबंधाविषयी शेवटपर्यंत जागरुकता हा ब्रिटिश वारसा नजरेआड करता येणार नाही. लष्करी दृष्टिकोणापेक्षा राजनिती दृष्टिकोन जास्त प्रभावी ठरला आणि भारताचे विभाजन अटळ झाले.

भारतीय परराष्ट्र धोरणाचा आकृतिबंध तयार करण्यात नेहरुंचे योगदान मोलाचे आहे. भारतीय संस्कृतीचा वारसा, भारतीय तत्वज्ञानातील मुल्ये आणि गांधीपासून ते अरविन्दोपर्यंतच्या विचारवंताच्या विचाराचे सार एकत्रित करुन नेहरुनी त्यांना तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या चौकटीत बसविले आणि त्या अनुषंगाने भारतीय परराष्ट्र धोरणाची उदिष्ट्ये आणि आधारभुत तत्वे निर्धारित केली. नेहरुच्या परराष्ट्र धोरणावरून त्यांचा आदर्शवाद आणि आतरराष्ट्रीय वाद प्रतिबंध होतो.

नेहरुच्या काळात भारताकडे तिसऱ्या जगाचे नेतृत्व करणारे राष्ट्र म्हणून बघितले जायचे विषेश म्हणजे नेहरूच्या काळात भारताचे जेवढे आंतरराष्ट्रीय भुमिका आणि प्रभाव होता तेवढा नतंर कधीच दिसला नाही अफ्रे आणि आशिया राष्ट्रीय एकीकरणासाठी नेहरुंनी केलेल्या प्रयत्नामुळे या राष्ट्राचे समर्थन भारताच्या पाठीशी होते हे समर्थन नेहरुच्या कालखंडानंतर कमी होत गेले. योची प्रचिती १९९६ मध्ये आली. शित युध्दाच्या राजकारणाचा प्रभाव नेहरूच्या परराष्ट्रधोरणावर स्पष्टपणे जाणवतो.शित युध्दाच्या राजकारणाला गृहित धरुनच नेहरुनी अलिप्तवादास भारतीय परराष्ट्रधोरणाचे आधारभूत तत्व बनवले.

नेहरुचा लोकशाही समाजवाद सन १९१७ च्या रशीयातील साम्यवादी क्रांतीने आणि इंग्लडच्या फेबियन समाजवादाने प्रभावीत झाला होता. लोकशाही समाजवादामध्ये साध्यय समाजवादाचे तर साधन लोकशाहीचे हे सुत्र अपेक्षीत आहे. लोकशाही आणि समाजवादी मुल्यांना जोडणारा मध्यम मार्ग म्हणून लोकशाही समाजवादाकडे बगीतले जाते. लोकशाही समाजवादाच्या माध्यमातुन पंडिती जवाहरलाल नेहरुने अमेरिका आणि सोविएत रशिया या दोन परस्पर विरोधी महासत्ताशी एकाच वेळी संवाद साधण्याचा सहकार्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

कौटिल्याने अर्थशास्त्राच्या सातव्या अधिकरणामध्ये षडगुणी सिध्दांत प्रतिपादीत केले आहे. राजमंडल सिध्दांत व षडगुण्यातील विषेश महत्त्व आहे. राज्याची विदेश निती सहा प्रकारची असावी संधी, विग्रह, यान, आसन, संशय, द्वदिभाव, याचा समावेश यात होतो. विदेश निती आणि आंतरराष्ट्रीय संबंध समजून घेण्यासाठी या सहा गुणांना समजून घेतल्यानंतर कौटिल्याने सांगितलेली विदेश निती स्पष्ट पणे डोळ्यासमोर येते.

तसेच आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात परराष्ट्र धोरनावर विशेष तत्वाने लिखान केले आहे. कौटिल्य हे भारतामधील प्रथम विचारवंत आहेत की, ज्यांनी विचारप्रवर्तक असा भारतीय राज्यासंबंधी सिध्दांत माडला. एका चांगल्या राज्यामध्ये चांगले कायदे, चांगल्या संस्था, प्रामाणिक आणि स्वच्छ प्रशासक व प्रजेला सुखसोई पुरेशा पुरवल्या जातात. अशा चांगल्या राज्याचे इतर राज्यासोबतचे परराष्ट्र संबंध चांगले असावे लागतात. अशा प्रकारच्या विजीगिषू राज्याच्या अवतीभवती असणाऱ्या या इतर राज्याच्या मंडळाचा विचार मांडून त्याच्या सोबत संबंध कसे ठेवावेत या संबंधीचे सविस्तर वर्णन राज्यमंडळ सिध्दांतात कौटिल्याने सांगितले आहे.

, कौटिल्याने अर्थशास्त्राच्या ६ व्या अधिकरणात राज्यमंडळाचे वर्णन लिहीले आहे. विजीगीषू राज्य केंद्रस्थानी मानून हा मंडल सिध्दांत स्पष्ट करण्यात आला आहे. शेजारील राज्य एकमेकांचे शत्रू आणि त्यांच्या पलिकडील राज्य

पहिल्या राज्यचे मित्र असे वलय तयार होत जाते. मित्र-शत्रू-मित्र असे अवती निर्माण होतात. दुरत्व असलेले पण समान ध्येय असलेले राज्य मित्रत्वाने जोडली जातात. विजीगीषू राज्याचे शत्रू राज्य त्यांच्या मित्रराज्यांचे अवर्ती पुर्ण होतात. अशा प्रकारे मंडलकार संबंध प्रस्थापित होत असतात. या कल्पनेवर आधारीत असणाऱ्या सिध्दांताला राज्याचा मंडल सिध्दांत या नावाने ओळखले जाते.

भारताचे पंचशील धोरण स्वतंत्र भारतीय परराष्ट्र धोरणाचे प्रमुख आधारभुत तत्व आहे. पंचशील धोरणातून भारतीय परराष्ट्र धोरणाचे केवळ उद्दीष्टच नाहीतर तत्वज्ञान देखील प्रतिबिंबित होते. भारतीय इतिहास आणि संस्कृतीच्या वारसाचे प्रतिनिधित्व पंचशील धोरणामधून होते. हे पंचशील धोरण गौतम बुध्दाच्या तत्वज्ञानापासून तर महात्मा गांधीच्या अहिंसावाद, रविंद्रनाथ टागोर, गोपाल क्रिष्ण गोखले याचा उदारमतवादी आंतरराष्ट्रीय बाद अरविंदचा अध्यात्मवाद आणि पंडीत जवाहरलाल नेहरुच्या लोकशाही समाजवादापर्यंतच्या मुल्याचे सार आहे. "जगा आणि जगू द्या" या भारतीय संस्कृतीच्या आणि तत्वाज्ञानाच्या आधारभूत तत्वाचा प्रसार करणारे हे तत्व आहे. पंचशील धोरण हे एखाद्या राष्ट्राच्या आतरराष्ट्रीय राजकारणातील वर्तुणूकीला नियंत्रीत करणारे तत्वे आहे. म्हणूनच पंचशील धोरणाचा उल्लेख आचारसंहिता Code of conduct असा केला जातो. भारताची आंतरराष्ट्रीय राजकारणातील भुमिका स्पष्ट करणारी ही एक नियमावली आहे. यात पाच तत्वाचा समावेश आहे.

१) प्रत्येक राष्ट्राची भौगोलीक एकात्मता आणि सार्वभौमत्वाचा आदर करणे

२) युध्द आणि आक्रमणाचा विरोध.

३) इतर राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.

४) समानता आणि परस्पर फायदा.

५) शांततापुर्ण सहजीवन.

ही पाच तत्वे गेल्या पन्नास वर्षापासून भारतीय परराष्ट्र धोरणाची मार्गदर्शक तत्वे आहेत.

पंचशील धोरणाचा स्विकार पहिल्या प्रथम एप्रिल १९५४ मध्ये भारत आणि चिन दरम्यान तिबेट विषयी झालेल्या कराराअंतर्गत करण्यात आला. या तत्वाचा स्विकार आनेक राष्ट्राने केला. उदा. युगोस्लाव्हिया, व्हियतनाम, म्यानमार, नेपाळ, कंबोडीया, लाओस इत्यादी १९५५ मध्ये झालेल्या आफ्रो-आशीया राष्ट्राच्या बाडुंग परिषेदेमध्ये पंचशील धोरणाचा स्विकार करण्यात आला ही तत्वे आंतरराष्ट्रीय राजकरणा विषयाच्या आदर्शवादी दृष्टीकोणाशी निगडीत आहेत. पंचशील धोरण आदर्शवादाप्रमाणे सत्तेच्या राजकारणाचा निषेध करणारे आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती :

१) कौटिल्य यांच्या राजकीय विचाराचे संकलन व विश्लेषण करणे.

२) राज्याच्या उत्पतीसंबंधी विचांराचे अध्ययन करणे

३) राजा (राजपती) संबंधी विचाराचे अध्ययन करणे

४) राजकारण, धर्म आणि नितीसंबंधीच्या विचाराचा अभ्यास करणे.

५) भारताच्या परराष्ट्रधोरणाच्या पारंपारीक वारशाचे अध्ययन करणे.

६) पंडित जवाहरलाल नेहरुच्या राजकीय विचाराचे संकलन व विश्लेषण करणे.

७) पंडित जवाहरलाल नेहरुचे राज्य, राज्याची कार्य, राज्याचे स्वरुपा संबंधी विचाराचे अध्ययन करणे.

८) नेहरुच्या धोरणावरील टिकात्मक प्रतिक्रीयाचे अध्ययन करणे.

९) पंडित नेहरुचे संयुक्त राष्ट्र संघटनेसंबंधी विचाराचें अध्ययन करणे.

१०) कौटिल्याचा षडगुंन्य सिध्दांत, राज्यमंडलाचा सिध्दांत अणि नेहरुच्या पंचशील तत्वाचा सखोल अभ्यास करणे.

संशोधनाचे महत्त्व :

१) आजची आंतरराष्ट्रीय स्थिती आणि परराष्ट्र संबंधाचा विचार केल्यास राजमंडल सिध्दांत आणि पंचशिल तत्वे या संबंधीचे विचार आजही राष्ट्रांना मार्गदर्शक ठरू शकतात.

२) गुप्तहेर, राजदुत, कुटनिती, शक्ती याचा वापर करुन आजही प्रभाव क्षेत्र वाढविण्याचे राष्ट्र प्रयत्न करीत आहेत.

३) आदर्श राज्यकर्ता बनण्यासाठी सदरील संशोधन उपयुक्त आहे

४) धर्मनिरपेक्ष राजा आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्र निर्माण होण्यासाठी या संशोधनाची उपयुक्तता आहे

५) दुर्बल राष्ट्राला बलशाली राष्ट्र बनवण्यासाठी हे संशोधन महत्वपुर्ण आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) एक राजनीती तंज्ञ म्हणून कौटिल्य यांच्या राजकीय विचाराचा अभ्यास करणे.

२) कौटिल्या यांच्या राज्य विस्तारासंबंधी, गुप्तहेर, राजदुत, राजकारण, धर्म, निती, कायदा या पार्श्वभुमितून तात्वीक अभ्यास करणे.

३) भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पारंपारीक वारसा या दृष्टीकोणातून अभ्यास करणे.

४) स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पंडित नेहरुच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.

५) कौटिल्याचा षडगुण्य सिध्दांत, राजमंडल सिध्दांत आणि पंडित नेहरुच्या पंचशिल तत्वाचे तुलनात्मक अध्ययन करणे.

६) बलशाली राष्ट्राच्या उभारणीच्या दृष्टीकोणातुन कौटिल्य व पंडित नेहरुच्या राजकीय विचाराचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :-

१) कौटिल्याचे राजकारण व नितीशास्त्रासंबंधीचे विचार दुहेरी स्वरुपाचे आहे.

२) भारतीय परराष्ट्र धोरणाला पारंपारीक वारसा लाभलेला आहे.

३) भारतीय परराष्ट्र धोरणाचा पंडित नेहरूंनी तयार केलेला आकृतीबध्द जागतिक शांतता प्रस्थापनेसाठी एकमेव पर्याय आहे.

४) पंचशील धोरण हे एखाद्या राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील वर्तनुकीला नियंत्रीत करणारे तत्वे आहे.

५) पंडित नेहरुच्या पंचशील तत्व परराष्ट्र धोरणामुळे जागतीक राजनीतीच्या क्षेत्रात नवे युग उदयास आले.

६) कौटिल्याचा षडगुन्य सिध्दांत, राजमंडल सिध्दांत आणि पंडित नेहरुच्या पंचशिल तत्वामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताला महत्त्वपुर्ण स्थान मिळाले आहे.

७) पंडित नेहरूंनी पुरस्कारीलेल्या व स्वीकारलेल्या परराष्ट्र धोरणाचे अंश काही प्रमाण कौटिल्याच्या राजकीय विचारात आहेत.

संशोधनाचे तथ्य संकलन पध्दती :

१) द्वितीय स्त्रोत :

१) कौटिल्य व पंडित नेहरुचे मुळ ग्रंथ

२) ग्रंथ

३) नियतकालीके

४) मासिके

५) वृत्तपत्रे

६) इंटरनेट

नमुना प्रणाली

१) सोयीस्कर नमुना प्रणाली

२) सहेतुक नमुना प्रणाली

३) स्वयं निर्वाचीक नमुनाप्रणाली

विश्लेषण पध्दती :

१) गुणात्मक विश्लेषण पध्दती

२) तुलणात्मक विश्लेषण पध्दती

प्रकरण :

१) प्रस्तावना -

कौटिल्य व पंडित नेहरु यांची जीवन चरित्रे

२) कौटिल्याचे राजकीय विचार -

राज्याच्या उत्पत्ती संबंधी विचार, राजा संबंधी विचार, कायदा, न्यायव्यवस्थेसंबंधी विचार, राज्य विस्तारासंबंधी विचार, गुप्तहेर, राजकारण, धर्मनिती

३) भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पारंपारिक वारसा. -

१) भारतीय उपखंडावरिल भुराजकीय प्रभाव आणि प्राचीन परंपरा २) मध्ययुगीन पंरपरा ३) ब्रिटिश परंपरा ४) स्वतंत्र चळवळ आणि परराष्ट्र धोरण ५) भारताचे विभाजन व पाकिस्तानची निर्मिती याचा भारताच्या परराष्ट्र धोरणविषयक दृष्टीकोणावर परिणाम.

४) पंडित जवाहरलाल नेहरूचे राजकीय विचार

१) पं. नेहरुचे परराष्ट्रीय धोरण २) अलिप्ततेचे धोरण ३) लोकशाही समाजवाद ४)राष्ट्रवाद
५) आंतरराष्ट्रवादा संबंधीचा विचार ६) धर्मनिरपेक्षता ७) जागतिक शांतता आणि युध्द या संबंधीचा विचार
८) सयुक्त राष्ट्र संघटने संबंधीचे विचार ९) राज्य, राज्याचे कार्य, राज्याचे स्वरुप १०) नेहरुच्या धोरणावरील टिकात्मक प्रतिक्रिया.

५) कौटिल्याचा षडगुण्य सिध्दांत, राजमंडल सिंध्दांत व पंडित नेहरुंची पंचशील तत्वे यांचा तुलनात्मक अध्ययन -

१) षडगुण्य सिध्दांत -

परराष्ट्र धोरणाचे सहा प्रकार १) संधी २) विग्रह ३) आसन ४) यान ५) संशोय ६) द्वेदी भाव ,

२) राजमंडल सिध्दांत -

परराष्ट्र संबंध १) विजिगिषु राज्य २) अरिराज्य ३) मित्र राज्य ४) अरिमित्र राज्य ५) मित्र मित्र राज्य ६) अरिमित्र मित्र राज्य ७) पार्ष्णिग्रही राज्य ८) आक्रंद राज्य ९) पार्ष्णिग्रहसार राज्य १०) अक्रदसार राज्य ११) मध्यम राज्य १२) उदासीन राज्य

३) पं. नेहरुचे पंचशिल तत्वे : पार्श्वभुमि प्रभाव

६) तुलनात्मक अध्ययनाची निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ सुची :

१) दुर्गा भागवत - कौटिल्य अर्थशास्त्र ग्रंथ

२) कै. बळवंत रामचंद्र हिवरगावकर - कौटिल्य अर्थशास्त्र ग्रंथ

३) प्रा. र. पं. कंगले - कौटिल्य अर्थशास्त्र ग्रंथ-सटित मराठी अर्थशास्त्र

४) पारमर - अ स्टडी ऑफ कौटिल्याज अर्थशास्त्र

५) डॉ. आर शर्माशास्त्री - अर्थशास्त्र भाषांतर (म्हैसूर प्रकाशन)

६) ए.के.सेन. - स्टडी इन हिंदू पॉलीटीकल थॉट्स

७) आर.एस.शर्मा - ऑस्पेक्टस ऑफ पॉलीटीकल आईडीयाज अँड इन्स्टीटीटयूशन्स इन एन्शीएंट इंडिया

८) आरीदत्त वेदांलकर - प्रमुख राजनितीक विचारवंत

९) देवदत्त शास्त्र - कौटिल्य अर्थशास्त्र की भूमिका (१ अध्ययन) इलाहाबाद १९५४

१०) आर.के.मुखर्जी - चंद्रगुप्त और उसका काल हिंदी अनुवाद राजकाम प्रकाशन १९६२

११) के.एम.अग्रवाल - कौटिल्य आन क्राइम एण्ड पनिशमेन्ट, अल्मोडा १९६०

१२) वाचस्पती गौराला - अर्थशास्त्र ऑफ कौटिल्य एण्ड द चाणक्य सुत्र, तृतीय संस्करण,वाराणसी, १९४८

१३) आर. सी. हिंगुराणी, - नेहरुज् फॉरेन पॉलिसी (नवीदिल्ली : ऑक्सफोर्ड, १९८९)

१४) पी. एन. आक्सर - नेहरुज् व्हिजन ऑफ फिस ऑन्ड सेक्युरेटी इन न्युक्लीअर ऐज (नवीदिल्लीपॅट्रियेटपब्लीशेअर्स)

१५) जवाहरलाल नेहरू - इंडियाज फॉरेन पौंलिसी ,सिलीक्टेड स्पिचेस(नवी दिल्ली १९९४)

१६) इंदर मल्होत्रा - इंडियन फॉरेन पॉलिसी इन हिस्टॉरिकल कॉन्टेस्ट वर्ल्ड फोकस ऑक्टोबर- डिसेंबर १९९६ -न्यू दिल्ली

१७) हरीशरण छाबरा - नेहरू दी आर्कीटेक्ट ऑफ इंडियन फॉरेन पॉलिसी, वर्ल्ड फोकस ऑक्टोबर- डिसेंबर १९९६ -न्यू दिल्ली

१८) पी.एन.हक्सर - इंडियाज फॉरेन पॉलिसी अँड इट्स प्रॉब्लेम्स (न्यू दिल्ली पॅट्रिअट पब्लिशर्स-१९८९)

१९) कृष्णापती मिश्रा - प्रबोध चंद्रोदय नाटक, व्दितीयांक

२०) शामलाल पांडेय - कौटिल्य की राज्यव्यवस्था, लखनऊ, सम्वत २०१५

संशोधक

बिरादार नृसिंह पांडूरंग

राज्यशास्त्र विभाग

शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

ता. चाकूर जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. अजय वसंतराव गव्हाणे

राज्यशास्त्र विभागप्रमुख

यशवंत महाविद्यालय, नांदेड

ता. जि. नांदेड